**14.09.2024** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

"गोड मुलांनो - बाबांच्या श्रीमतावर चालून आपला श्रृंगार करा, परचिंतन करून आपला श्रृंगार बिघडवू नका, वेळ वाया घालवू नका"

प्रश्नः- तुम्ही मुले बाबांपेक्षा देखील जास्त कुशाग्र जादूगार आहात - ते कसे?

उत्तरः- इथे बसल्या-बसल्या तुम्ही या लक्ष्मी-नारायणासारखा आपला श्रृंगार करत आहात. इथे बसून आपणच आपल्याला परिवर्तित करत आहात, ही देखील जादू आहे. फक्त अल्फची (बाबांची) आठवण केल्याने तुमचा श्रृंगार होतो. यामध्ये काही हात-पाय हलविण्याचीसुद्धा गरज नाही फक्त विचार करण्याची गोष्ट आहे. योगामुळे तुम्ही साफ, स्वच्छ आणि सुंदर बनता, तुमची आत्मा आणि शरीर कांचन (सोने) बनते, ही देखील कमाल आहे ना.

ओम् शांती. रुहानी जादूगार बसून रुहानी मुलांना, जे बाबांपेक्षा देखील कुशाग्र जादूगार आहेत, त्यांना समजावून सांगत आहेत - 'तुम्ही इथे काय करत आहात?' इथे बसून देखील कोणतीही हालचाल नाही. बाबा अथवा साजण, सजणींना युक्ती सांगत आहेत. साजण विचारत आहेत - 'इथे बसून तुम्ही काय करत आहात?' तुम्ही स्वतःला लक्ष्मी-नारायणाप्रमाणे श्रृंगारत आहात. हे इतर कोणाला तरी समजेल का? तुम्ही सर्व इथे बसले आहात मग नंबरवार पुरुषार्थां अनुसार तर आहातच ना. बाबा म्हणतात - 'तुम्हाला असे श्रृंगारलेले बनायचे आहे'. तुमचे हे एम ऑब्जेक्ट आहेच भविष्यकालीन अमरपुरीसाठी. इथे बसून तुम्ही काय करत आहात? स्वर्गाच्या श्रृंगारासाठी पुरुषार्थ करत आहात. म्हणजेच याला काय म्हणाल? इथे बसून स्वतःला परिवर्तित करत आहात. उठता-बसता, चालता-फिरता बाबांनी एक मनमनाभवची चावी दिलेली आहे. बस्स, याच्या शिवाय इतर कोणत्याही व्यर्थ गोष्टी ऐकून अथवा ऐकवून वेळ वाया घालवू नका. तुम्ही आपल्याच श्रृंगारामध्ये मग्न रहा. दुसरा कोणी करतो किंवा नाही त्याच्याशी तुमचा काय संबंध! तुम्ही आपल्या पुरुषार्थामध्ये व्यस्त रहा. किती समजून घेण्यासारख्या गोष्टी आहेत. कोणी नवख्याने ऐकले तर नक्कीच आश्चर्य वाटेल. तुमच्यापैकी काहीजण आपला श्रृंगार करत आहेत आणि काहीजण तर अजूनच बिघडवून टाकत आहेत. परचिंतन इत्यादीमध्ये वेळ वाया घालवत राहतात. बाबा मुलांना समजावून सांगतात - 'तुम्ही फक्त स्वतःला बघा की, आपण काय करत आहोत'. अगदी छोटीशी युक्ती सांगितली आहे - बस्स, एकच शब्द आहे - मनमनाभव. तुम्ही इथे बसला आहात परंतु बुद्धीमध्ये आहे की साऱ्या सृष्टीचे चक्र कसे फिरते. आता आम्ही पुन्हा विश्वाचा श्रृंगार करत आहोत. तुम्ही किती पद्मा-पदम भाग्यशाली आहात. इथे बसल्या-बसल्या तुम्ही किती मोठे कार्य करता. हात-पाय हलविण्याची काहीच गरज नाही; फक्त विचार करायचा आहे. तुम्ही म्हणाल - आम्ही इथे बसून विश्वाचा सर्वोच्च श्रृंगार करत आहोत. मनमनाभव मंत्र किती श्रेष्ठ आहे. या योगाद्वारेच तुमची पापे भस्म होत जातील आणि तुम्ही स्वच्छ बनत-बनत मग किती सुंदर व्हाल. आता आत्मा पतित आहे तर शरीराची देखील अवस्था बघा काय झाली आहे! आता तुमची आत्मा आणि काया कांचन बनेल (शरीर निरोगी बनेल). हा चमत्कार आहे ना. तर असा आपला श्रृंगार करायचा आहे. दैवी गुणसुद्धा धारण करायचे आहेत. बाबा सर्वांना एकच मार्ग सांगतात - अल्फ आणि बे (बाबा आणि बादशाही). फक्त बाबांची गोष्ट आहे. बाबांची आठवण करत रहा तर तुमचा सर्व श्रृंगार बदलून जाईल.

तुम्ही बाबांपेक्षा देखील मोठे जादूगार आहात. तुम्हाला युक्ती सांगतात की असे-असे केल्याने तुमचा श्रृंगार होईल. आपला श्रृंगार न केल्यामुळे तुम्ही फुकटचे आपले नुकसान करून घेता. इतके तर समजता की आपण भक्तीमार्गामध्ये काय-काय करत होतो. सर्व श्रृंगारच बिघडवून आता काय बनलो आहोत! आता एकाच शब्दाने, बाबांच्या आठवणीने तुमचा श्रृंगार होतो. मुलांना किती चांगल्या प्रकारे समजावून सांगून रिफ्रेश करतात. इथे बसून तुम्ही काय करत आहात? आठवणीच्या यात्रेमध्ये बसले आहात. जर कोणाचे विचार दुसरीकडे कुठे जात असतील तर श्रृंगार थोडाच होईल? तुम्ही श्रृंगारलेले असाल तर मग इतरांना देखील मार्ग सांगायचा आहे. बाबा येतातच मुळी असा श्रृंगार करण्यासाठी. शिवबाबा तुमची कमाल आहे, तुम्ही आमचा किती श्रृंगार करता. उठता, बसता, चालता आपल्याला आपला श्रृंगार करायचा आहे. काहीजण मग आपला श्रृंगार करून मग दुसऱ्यांचा सुद्धा करतात. काहीजण मग आपला सुद्धा श्रृंगार करत नाहीत आणि दुसऱ्यांचा सुद्धा श्रृंगार बिघडवत राहतात. व्यर्थ

गोष्टी ऐकवून त्यांची अवस्था सुद्धा खाली आणतात. स्वतः देखील श्रृंगारापासून वंचित राहतात, तर दुसऱ्यांना देखील वंचित करतात. तर नीट विचार करा - बाबा कोणकोणत्या युक्त्या सांगतात. भक्तीमार्गातील शास्त्रे वाचल्याने काही या युक्त्या येत नाहीत. शास्त्रे तर आहेतच भक्तीमार्गाची. लोक तुम्हाला विचारतात - 'तुम्ही शास्त्रांना मानत नाही?' तर तुम्ही बोला, 'आम्ही तर सर्व मानतो. अर्धा कल्प भक्ती केली आहे. शास्त्रे वाचतो तर कोण नाही मानणार. रात्र आणि दिवस असतो तर नक्कीच दोघांनाही मानणार ना. हा आहे बेहदचा दिवस आणि रात्र'.

बाबा म्हणतात - 'गोड मुलांनो, तुम्ही आपला श्रृंगार करा. वेळ वाया घालवू नका. वेळ फार कमी आहे'. तुमची खूप विशाल बुद्धी असली पाहिजे. आपसामध्ये खूप प्रेम असले पाहिजे. वेळ वाया घालवता कामा नये कारण तुमचा वेळ तर खूप अमूल्य आहे. तुम्ही कवडीपासून हिऱ्या समान बनता. एवढे सर्व फुकटचे थोडेच ऐकत आहात. ही काही कोणती कथा आहे का! बाबा एकच शब्द ऐकवतात. मोठ्या व्यक्तींना जास्त थोडेच बोलायचे असते. बाबा तर सेकंदामध्ये जीवनमुक्तीचा मार्ग दाखवतात. हे आहेतच श्रेष्ठ श्रृंगार असणारे, म्हणून तर त्यांचीच चित्रे आहेत ज्यांची खूप पूजा करत राहतात. जितकी मोठी व्यक्ती असेल तेवढे मोठे मंदिर बनवतात, जास्तीतजास्त श्रृंगार करतात. आधी तर देवतांच्या चित्रांना हिऱ्यांचा हार घालत असत. बाबांना (ब्रह्मा बाबांना) तर अनुभव आहे ना. बाबांनी स्वतः लक्ष्मी-नारायणासाठी हिऱ्यांचा हार बनवला होता. खरे तर त्यांच्यासारखा पोशाख इथे कोणीही बनवू शकणार नाही; आता तुम्ही नंबरवार पुरुषार्था नुसार बनवत आहात. तर बाबा समजावून सांगत आहेत - 'मुलांनो, आपलाही वेळ वाया घालवू नका आणि दुसऱ्यांचा देखील वेळ वाया घालवू नका'. बाबा खूप सोपी युक्ती सांगतात. माझी आठवण करा तर पापे नष्ट होतील. आठवणी शिवाय एवढा श्रृंगार करता येणार नाही. तुम्ही हे बनणार आहात ना. दैवी स्वभाव धारण करायचा आहे. हे सांगण्याची देखील आवश्यकता नाही. परंतु पत्थर-बुद्धी असल्यामुळे समजावून सांगावे लागते. एका सेकंदाची गोष्ट आहे. बाबा म्हणतात - 'गोड-गोड मुलांनो, तुम्ही आपल्या पित्याला विसरल्यामुळे श्रृंगार किती बिघडवून टाकला आहे'. बाबा तर म्हणतात चालता-फिरता श्रृंगार करत रहा. परंतु माया सुद्धा काही कमी नाहीये. काहीजण लिहितात - 'बाबा, तुमची माया फार त्रास देते'. बाबा म्हणतात - 'अरे, माझी माया कुठे आहे, हा तर खेळ आहे ना! मी तर तुम्हाला मायेपासून सोडविण्यासाठी आलो आहे. मग माझी माया कसली!' यावेळी पूर्ण राज्य हिचेच आहे. जसा या दिवस आणि रात्रीमध्ये बदल असू शकत नाही. ही तर मग आहे बेहदची रात्र आणि दिवस. यामध्ये एका सेकंदाचा देखील बदल होऊ शकत नाही. आता तुम्ही मुले नंबरवार पुरुषार्था अनुसार असा श्रृंगार करत आहात. बाबा म्हणतात - चक्रवर्ती राजा बनायचे असेल तर चक्र फिरवत रहा. भले गृहस्थ व्यवहारामध्ये रहा, यासाठी फक्त बुद्धीचा वापर करायचा आहे. आत्म्यातच मन-बुद्धी आहे. इथे तुम्हाला बाहेरच्या काहीही कटकटी नाही आहेत. इथे तुम्ही येताच आपल्याला श्रृंगारण्यासाठी, रिफ्रेश होण्यासाठी. बाबा तर सर्वांना एकसारखेच शिकवतात. इथे बाबांकडे येतात नवे-नवे मुद्दे ऐकण्यासाठी, मग घरी गेल्यावर जे काही ऐकले आहे ते बाहेर निघून जाते. इथून बाहेर पडताच झोळी झटकतात. जे ऐकले त्याच्यावर मनन-चिंतन करत नाहीत. तुमच्यासाठी तर इथे एकांतासाठी खूप जागा आहेत. बाहेर तर ढेकूण फिरत असतात. एकमेकांना मारून टाकतात, रक्त पीत राहतात.

तर बाबा मुलांना समजावून सांगत आहेत - 'हा तुमचा अत्यंत मौल्यवान वेळ आहे, हा वाया घालवू नका. आपला श्रृंगार करण्यासाठी भरपूर युक्त्या मिळाल्या आहेत. मी सर्वांचा उद्धार करण्यासाठी येतो. मी आलो आहे तुम्हाला विश्वाचे राज्य देण्यासाठी. तर आता माझी आठवण करा, वेळ वाया घालवू नका'. काम-धंदा करत असताना सुद्धा बाबांची आठवण करत रहा. इतके सर्व आत्मे एका परमपिता परमात्मा माशूकचे आशिक आहेत. त्या साऱ्या लौकिक कथा इत्यादी तर तुम्ही खूप ऐकता. आता बाबा म्हणतात - ते सर्वकाही विसरून जा. भक्तीमार्गामध्ये तुम्ही माझी आठवण केली आणि वचनसुद्धा दिले आहे की, आम्ही तुमचेच बनणार. इतक्या साऱ्या आशिकांचा एक माशूक आहे. भक्तीमार्गामध्ये असे म्हणतात - 'ब्रह्ममध्ये लीन होऊन जाणार', या साऱ्या व्यर्थ गोष्टी आहेत. एकही मनुष्य मोक्ष प्राप्त करू शकत नाही. हा तर अनादि ड्रामा आहे, इतके सगळे ॲक्टर्स आहेत, यामध्ये थोडा सुद्धा फरक पडू शकत नाही. बाबा म्हणतात - 'फक्त एका अल्फची (बाबांची) आठवण करा तर तुमचा असा श्रृंगार होईल. आता तुम्ही हे बनत आहात. आठवते आहे - आम्ही अनेक वेळा हा श्रृंगार केला आहे. बाबा तुम्ही कल्प-कल्प याल, आम्ही तुमच्याकडूनच ऐकू. किती अति गूढ पॉईंट्स आहेत. बाबांनी युक्ती खूप चांगली सांगितली आहे. अशा बाबांवर बलिहार जावे. आशिक-माशूक देखील सगळेच काही एकसारखे असत

नाहीत. हे तर सर्व आत्म्यांचे एकच माशूक आहेत. ही काही भौतिक देहाची गोष्ट नाही. परंतु तुम्हाला संगमयुगावरच बाबांकडून ही युक्ती मिळते. तुम्ही कुठेही जा, खा-प्या, हिंडा-फिरा, नोकरी करा, आपला श्रृंगार करत रहा. सर्व आत्मे एका माशूकचे आशिक आहेत. बस्स, त्यांचीच आठवण करत रहा. काही-काही मुले म्हणतात, आम्ही तर २४ तास आठवण करत असतो. परंतु कोणीही निरंतर आठवण काही करू शकत नाही. जास्तीत जास्त दोन-अडीच तास. जर जास्त लिहिले तर बाबा मान्य करत नाहीत. दुसऱ्यांना आठवण करून देत नाही तर कसे समजणार की, तुम्ही आठवण करता? काही अवघड गोष्ट आहे काय? याच्यात काही खर्च आहे काय? काहीही नाही. बस्स, बाबांची आठवण करत रहा तर तुमची पापे नष्ट होतील. दैवी गुणसुद्धा धारण करायचे आहेत. कोणीही पतित शांतिधामला आणि सुखधामला जाऊ शकणार नाही. बाबा मुलांना सांगतात, स्वतःला आत्मा भाऊ-भाऊ समजा. ८४ जन्मांचा पार्ट आता पूर्ण होत आहे. हे जुने वस्त्र (शरीर) सोडायचे आहे. ड्रामा बघा कसा बनलेला आहे. तुम्ही नंबरवार पुरुषार्था अनुसार जाणता. दुनियेमध्ये तर कोणालाच काहीही समजत नाही. प्रत्येकाने स्वतःला विचारा की, मी बाबांच्या श्रीमतावर चालतो का? चालाल तर श्रृंगार देखील चांगला होईल. एकमेकांना उलट्या गोष्टी सांगून किंवा ऐकून आपलासुद्धा श्रृंगार बिघडवतात आणि दुसऱ्यांचा सुद्धा बिघडवतात. मुलांनी तर याच विचारामध्ये व्यस्त रहायचे आहे की, मला असे श्रृंगारधारी कसे बनता येईल. बाकी इतर जे काही आहे ते ठीक आहे. पोटापुरती भाकरी आरामात मिळेल. खरे पाहता पोट काही जास्त खात नाही. भले तुम्ही संन्यासी आहात परंतु राजयोगी आहात. ना खूप उच्च, ना नीच. भले खा परंतु सवय लागायला नको. एकमेकांना याचीच आठवण करून द्या - शिवबाबांची आठवण आहे? वारसा लक्षात आहे? विश्वाच्या बादशाहीचा श्रृंगार लक्षात आहे? विचार करा - इथे बसल्या-बसल्या तुमची केवढी कमाई आहे! या कमाईमुळे अपार सुख मिळणार आहे, केवळ आठवणीच्या यात्रेमुळे; बाकी काहीच त्रास नाही. भक्तीमार्गामध्ये मनुष्य किती त्रास सहन करतात. आता बाबा आले आहेत श्रृंगारण्यासाठी. तर स्वतःची चांगल्या प्रकारे काळजी घ्या. विसरू नका. माया विसरायला लावते मग खूप वेळ वाया घालवतात. तुमचा तर हा वेळ अतिशय मौल्यवान आहे. शिक्षणासाठी मेहनत करून मनुष्य कशाचे काय बनतात. बाबा तुम्हाला आणखी कोणता त्रास देत नाहीत. फक्त म्हणतात - 'माझी आठवण करा'. कोणतेही पुस्तक इत्यादी वाचण्याची आवश्यकता नाही. बाबा काही पुस्तक वाचतात का? बाबा म्हणतात - 'मी येऊन या प्रजापिता ब्रह्माद्वारे तुम्हाला दत्तक घेतो'. 'प्रजापिता' आहे ना. तर इतकी प्रजा कुख-वंशावली कशी असेल? मुले दत्तक जातात. वारसा बाबांकडून मिळणार आहे. बाबा तुम्हाला ब्रह्मा द्वारे दत्तक घेतात, म्हणून त्यांना 'मात-पिता' म्हटले जाते. हे देखील तुम्ही जाणता. बाबांचे आगमन एकदम अचूक आहे. अचूक वेळेवर येतात, अचूक वेळी जातील. दुनिया परिवर्तन तर होणारच आहे. बाबा आता तुम्हा मुलांना किती बुद्धीवान बनवतात. बाबांच्या मतानुसार चालायचे आहे. विद्यार्थी जे वाचतात तेच बुद्धीमध्ये चालू राहते. तुम्ही देखील हे संस्कार घेऊन जाता. जसे बाबांमध्ये संस्कार आहेत तसेच तुमच्या आत्म्यामध्ये देखील हे संस्कार भरत आहेत. मग पुन्हा जेव्हा इथे याल तेव्हा तोच पार्ट रिपीट होईल. नंबरवार पुरुषार्था अनुसार याल. आपल्या मनाला विचारा की, आपल्याला श्रृंगारण्यासाठी मी किती पुरुषार्थ केला आहे? वेळ कुठे वाया तर घालवला नाही ना? बाबा सावध करतात - कुठेही वाह्यात गोष्टींमध्ये वेळ घालवू नका. बाबांचे श्रीमत लक्षात ठेवा. मानवी मतावर चालू नका. तुम्हाला हे थोडेच माहीत होते कि आपण जुन्या दुनियेमध्ये आहोत. आता बाबांनी सांगितले आहे की, तुम्ही कोण होता. या जुन्या दुनियेमध्ये किती अपार दुःख आहे. हा देखील ड्रामा अनुसार पार्ट मिळालेला आहे. ड्रामा अनुसार अनेक प्रकारची विघ्ने देखील येतात. बाबा समजावून सांगत आहेत - 'मुलांनो, हा ज्ञान आणि भक्तीचा खेळ आहे. ड्रामा अद्भुत आहे'. इतक्या छोट्याशा आत्म्यामध्ये सर्व अविनाशी पार्ट भरलेला आहे, जो बजावतच राहते. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) इतर सर्व गोष्टी सोडून याच धूनमध्ये रहायचे आहे की मला लक्ष्मी-नारायणासारखे श्रृंगारधारी कसे बनता येईल?
2. २) स्वतःला विचारायचे आहे की -
3. (अ) मी श्रीमतावर चालून मनमनाभवच्या चावीने आपला श्रृंगार व्यवस्थित करत आहे का?
4. (ब) उलट्या-सुलट्या गोष्टी ऐकून किंवा ऐकवून श्रृंगार बिघडवत तर नाही ना?

5. (क) आपसामध्ये प्रेमाने राहतो का? आपला बहुमूल्य वेळ कुठेतरी वाया तर घालवत नाही ना?
6. (ड) दैवी स्वभाव धारण केला आहे का?

वरदान:- व्यर्थ संकल्पांची कारणे जाणून त्यांना नष्ट करणारे समाधानस्वरूप भव

व्यर्थ संकल्प उत्पन्न होण्याची प्रमुख दोन कारणे आहेत. (१) अभिमान, आणि (२) अपमान. 'मला कमी का, माझे सुद्धा हे पद असायला हवे, मलासुद्धा पुढे केले पाहिजे…' तर यामध्ये एक तर आपला अपमान समजता नाहीतर मग अभिमानामध्ये येता; नावाचा, मानाचा, पुढे येण्यामध्ये, सेवेमध्ये... अभिमान किंवा अपमान वाटणे हेच व्यर्थ संकल्पांचे कारण आहे, या कारणाला जाणून निवारण करणे हेच समाधान स्वरूप बनणे आहे.

बोधवाक्य:- शांतीच्या शक्तीद्वारे स्वीट होमची यात्रा करणे अतिशय सोपे आहे.

||| ओम शांती |||